जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १५२ दिनांक - ०७/०३/२०२५**

हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर

# हडपसर परिसरातुन आर्थिक व्यवहारातील पैसे वसुल करण्याचे उद्देशाने अपहरण केलेल्या पिडीताची ६ तासात सुटका व आरोपी जेरबंद

दिनांक ०७/०३/२०२५ रोजी फिर्यादी यांनी पोलीस ठाणेस येवून कळवीले की, दि.०६/०३/२०२५ रोजी फिर्यादी यांच्या राहते घरी अज्ञात ४ ते ५ इसम आले व त्यांनी त्याचे वडीलाकडे फर्निचरचे काम करण्याचे सांगुन त्यांना राहते घरातुन घेवुन गेले. त्यानंतर रात्रौ ०१.०० वा सुमारास फिर्यादी यांचे वडीलांनी कॉल करुन घाबरत बोलत उदया सकाळ पर्यत घरी येतो असे सांगुन फोन बंद केला. तेव्हा फिर्यादी यांनी सदरचा प्रकार नियंत्रण कक्ष व हडपसर पोलीस स्टेशन येथे समक्ष येवुन घडलेला प्रकार सांगुन तक्रार दिल्याने हडपसर पोलीस ठाणे गु.र.नं २७६/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १४०(३), ३(५) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्ह्याचे गांभिर्य ओळखून मा.पोलीस उपआयुक्त,परिमंडळ-०५ डॉ.राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर श्री.संजय मोगले, यांच्या सुचनांप्रमाणे तपासपथक अधिकारी पोलीस उप निरीक्षक हसन मुलाणी, सत्यवान गेंड, व तपास पथक अंमलदार श्रीकांत पांडुळे,अजित मदने,चंद्रकांत रेजितवाड,तुकाराम झुंजार,अमित साखरे,महेश चव्हाण,महाविर लोंढे यांचे पथक तयार केले.

अपहृत इसम यांचे मोबाईल वर आलेल्या कॉलची माहीती घेतली असता, नमुदचा क्रमांक हा बंद मिळून आला. दाखल गुन्ह्याचे केले तांत्रिक तपासात संशयीत इसम हे वेळोवेळी आपले ठिकाण बदलत असल्याचे दिसून आले. तसेच संशयीत इसम हे खेड शिवापूर,शिंदेवाडी,जांभूळवाडी,नऱ्हे भागात फिरत असल्याची माहीती प्राप्त झाली होती. संशयीत इमसांचे बाबत गोपनिय बातमी मिळवून आरोपी हे पिडीतास घेवून कात्रज घाटाच्या पायथ्यास येणार आहेत अशी खात्रीशीर माहीती प्राप्त झाल्याने तपास पथकाने सापळा रचून अपहृत इसम तसेच आरोपीत नामे **१) प्राजस दिपक पंडित वय २५ वर्ष रा.स्वामी सदन,त्रिमुर्ती चौक,भारती विदयापीठ पुणे** यांना ताब्यात घेतले.

ताब्यात असलेल्या आरोपीत इसमाकडे अधिक तपास करता त्याने त्याचे साथीदार व त्याचे इतर साथीदारांच्या मदतीने मांजरी येथून अपहरण करून आणल्याचे सांगितले.अपहृत व्यक्ती व आरोपी यांच्यात आर्थिक व्यवहार होता.आर्थिक व्यवहारातील पैसे वसुल करण्याचे उद्देशाने अपहरण केल्याची कबुली दिली आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ डॉ.राजकुमार शिंदे, यांचे मागदर्शनाखाली मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे श्रीमती अनुराधा उदमले,वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन,पुणे शहर श्री.संजय मोगले, पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री.निलेश जगदाळे,यांचे सुचनांप्रमाणे तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप निरीक्षक हसन मुलाणी,सत्यवान गेंड, पो.अंमलदार अविनाश गोसावी,संदीप राठोड,श्रीकांत पांडुळे,दिपक कांबळे,चंद्रकांत रेजितवाड,अजित मदने,अमोल दणके,कुंडलीक केसकर,अमित साखरे,अभिजीत राऊत,तुकाराम झुंजार,महाविर लोंढे,महेश चव्हाण,बापु लोणकर,अमोल जाधव यांचे पथकाने केली आहे.

